# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



सकाळ ★पुणे जिल्हा शुक्रवार २९ जानेवारी २०१६

हा देश मला काय देईल, यापेक्षा मी या देशाला काय देईल, याचा विचार प्रत्येकाने करावा आणि लोकशाही सशक्त होण्यासाठी एकात्मता टिकवा.
– अरुण गुजराथी, विधानसभेचे माजी अध्यक्ष

# सशक्त लोकशाहीसाठी एकात्मता टिकवा

## अरुण गुजराथी यांचे राजगुरुनगरमध्ये आवाहन

**राजगुरुनगर, ता. २८ :** "हा देश मला काय देईल, या पेक्षा मी या देशाला काय देईल, याचा विचार प्रत्येकाने करावा आणि लोकशाही सशक्त होण्यासाठी एकात्मता टिकवून ठेवा. लोकशाहीच्या माध्यमांतून सामाजिक न्यायाची भूमिका घेतली पाहिजे. जे लोक प्रश्न मांडू शकत नाही; त्यांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका घेतली पाहिजे. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींकडे विकास, सेवा आणि संपर्क हे तीन महत्त्वाचे गुण असायला हवेत," असे मत विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी व्यक्त केले.

राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'लोकशाही काल, आज आणि उद्या' या विषयावर गुजराथी बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव ॲड. राम कांडगे, शांताराम घुमटकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, प्रा. ए. जी. कुलकर्णी उपस्थित होते.

**राजगुरुनगर (ता. खेड) : साहेबराव बुट्टे पाटील व्याख्यानमालेमध्ये व्याख्यान देताना विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी.**

गुजराथी म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य खऱ्या अर्थाने लोकशाही प्रधान रयतेचे राज्य होते. महाराजांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करताना पहिल्यांदा अष्टप्रधान मंडळ नेमले. लोकशाही आणि विकास शेवटच्या माणसापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. या विचार व आचाराची सध्या गरज आहे. आपल्याला लोकशाहीशिवाय पर्याय नसून संप्रदाय, जात, धर्म सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा विचार हवा. हे राष्ट्र एकत्र ठेवलं तरच लोकशाही बळकट होईल. लोकशाहीमध्ये संवाद गरजेचा असून, सभागृह सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी चालू ठेवण्याची भूमिका घेतली पाहिजे. आपली लोकशाही समृद्ध करण्यासाठी सक्तीचे मतदान, शिक्षित लोकप्रतिनिधी, विधानसभा अध्यक्ष पुढील निवडणुकीत बिनविरोध देणे, राइट टू कॉल बॅक, ५ वर्षांसाठी संसद अथवा विधानसभा कायम ठेवणे, या संबंधी नव्याने विचार करण्याची गरज आहे."

गुजराथी यांनी विधानसभेच्या कामकाजाबद्दल माहिती देताना हक्कभंग प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव, अर्थसंकल्प, अशासकीय विधेयके, अशासकीय ठराव, तारांकित प्रश्न, व्हीप, पोलबाबत माहिती सांगितली. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. तेजस्विनी सातकर हिने आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख